Reg. No. NP CITY/236/2018-20.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १८ ] गुरुवार, जुलै २, २०२६/आषाढ ११, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३.

### उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २), यांजकडून

### भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ कलम १९(१) अन्वये खालील अधिसूचना

क्रमांक उजिभूक्र.२-मं.अ.-कावि-४९-२०२६.—

ज्याअर्थी समुचित शासन असलेल्या नागपूर जिल्ह्याच्या अधिकाऱ्याने भुमिसंपादन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात या पुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्रमांक-उजिभु-मं. स.-कावि २२४-२०२६, दिनांक १३ एप्रिल, २०२६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची दोनमध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. किंवा तिची आवयश्कता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्हाधिकाऱ्याने कलम १५ च्या पोट कलम(२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ पोटकलम(१) च्या तरतुदीन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसन क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असुन, पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. २, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक
## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १२-अ-६५-२०२५-२६, मौजा : किन्ही, तह. कुही, जिल्हा नागपूर

| अ.क्र. | जमिन मालकाचे नांव | गट क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | हे. आर |
| १ | ईश्वर तुकाराम डहारे | २०७ | ० १८ |
| २ | योगोश झीगु वैदय, पांडुरंग झीगु वैदय, कांताबाई बाळाजी कुकडे, गोपाल झीगु वैदय, प्रमीला सुरेश भुरले, मोतीराम झीगु वैदय | ३९० | ० ०७ |
| | | एकूण . . | ० २५ |

## अनुसूची- दोन
## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | : | आंभोरा उपसासिंचन विभाग, भिवापुर. |
| प्रकल्पाचे कामाचे विवरण | : | अंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा -२ अंतर्गत किन्ही वितरीकेच्या मातीकाम व बांधकामा करीता शेतजमीन संपादित करण्याबाबत भुसंपादन प्रस्ताव. |
| प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे | : | अंभोरा उपसा सिंचन योजना टप्पा -२ अंतर्गत किन्ही वितरीकेच्या मातीकाम व बांधकामा करीता |

## अनुसूची- तीन
## पुनर्वसन क्षेत्राचे वर्णन

- निरंक -

## अनुसूची-चार
## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

१) कार्यकारी अभियंता, आंभोरा उपसासिंचन विभाग, भिवापुर यांचेकडील पत्र जा. क्र. २२३१-चिशा-भुसंपादन-२०२५, दिनांक ६ नोव्हेंबर, २०२५.

२) महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग शासन निर्णय क्र.जि.ओ.एस.-१०८१-(२३/१असंज, २ मंत्रालय, मुबंई) दिनांक ३१ मार्च, १९८३ संपादनामुळे भुधारक विस्थापित होत नाही त्यामुळे त्यांना विस्थापनाचा लाभ देता येणार नाही. महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९८६ व तदनंतर या प्रकल्पाबाबत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयानुसार लाभ देण्यात येतील.

**टिप** : उक्त जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र. २ विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांचे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

नागपूर :
दिनांक ३० जून, २०२६.

**अखीलभारत मेश्राम,**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. २),
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.